# आधुनिक तंत्रज्ञानाने दोडका लागवड

डॉ. वैशाली बोरकर श्री. लोपचंद डोंगरवार
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

महाराष्ट्रामध्ये दोडक्याची लागवड हि सर्वत्र होते, परंतु लागवडीखाली क्षेत्र मात्र अत्यंत कमी आहे. दोडका हे बारमाही येणारे आणि ३ महिन्यात संपणारे पीक असून आरोग्यासाठी दोडका हा पौष्टीक असून घराघरात हा भाजीपाला आवडता असून त्याची चांगली विक्री होत असते. त्यामुळे एक अर्थाने शेतकऱ्यांसाठी हे रोख पीक आहे. व्यापारी तत्वावर दोडक्याची लागवड करून दर्जेदार उत्पादन घेण्यास मोठा वाव आहे.



### जमीन:

दोडका लागवडीकरिता हलकी ते मध्यम काळी कसदार जमीन निवडावी पाणथळ किंवा चोपण जमिनीत दोडका घेऊ नये. जमिनीमध्ये मुबलक प्रमाणात शेंद्रिय घटक असावेत, चांगल्या पोताची भुसभुशीत जमिनीत दोडका उत्तम येतो.

### हवामान:

कोरड्या ते समतोल हवामानात व उन्हाळ्यात पाण्याची व्यवस्था असल्यास अतिशय चांगल्याप्रकारे पिकाची वाढ होते. २५° ते ३५° सेल्शिअस हे तापमान दोडक्याच्या वाढीस योग्य आहे मात्र अति थंडीत या पिकाची वाढ होत नाहीत. आणि जास्त पावसाच्या कालावधीत म्हणजे १५ ते २० दिवस सतत पाऊस पडल्याने वेलाची पाने, वेल, खोड, मुळाभोवतालचा भाग यावर विविध प्रकारची कीड व रोगांचा प्रादूर्भाव होतो.

### जाती:

पुसाचिकणी, पुसासुप्रिया, फुलेप्राजक्ता, फुलेकोमल (संकरित)

### जमिनीची मशागत:

जमिनीची खोल नांगरणी करावी, नांगरणीनंतर कुळवाणे आडवी उभी कुळवणी करून शेत भुसभुशीत करावे. कुळवणी करण्याअगोदर २५ टन शेणखत प्रति हेक्टरी द्यावे व जमिनित मिसळून घ्यावे.

जमिनीची चांगली मशागत झाल्यावर १.५ मीटर अंतरावर ६० से. मी. रुंदीच्या सऱ्या पाडाव्यात.

### लागवड:

खरीप व उन्हाळी या दोन्ही हंगामात दोडका येतो. खरीप हंगामात मे ते जून तर उन्हाळी हंगामात जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात लागवड करावी. दंडाच्या काठाने लहान आल्यात बी टोकून १.५ x १ मीटर अंतरावर लागवड करावी. एका ठिकाणी २ ते ३ बिया टोकाव्यात व नंतर २ रोपे ठेवावीत. टोकनि नंतर लगेचच पाणी द्यावे. हेक्टरी २ किलो बियाणे पुरेसे आहेत.

### खत व्यवस्थापन:

बियाणांची लागवड करण्यापूर्वी सऱ्यांमध्ये २५ किलो नत्र, २५ किलो स्फुरद मिसळावे. व लागवडीनंतर १ महिन्यांनी नत्राचा दुसरा हप्ता द्यावा.

### पाणी व्यवस्थापन:

दोडका सहसा हा पाण्याचा ताण सहन करू शकतो परंतु समाधानकारक उत्पनासाठी नेहमीच्या व पुरेसे पाणी द्यावे. खरिपामध्ये पावसाचा खंड पडल्यास १० ते १२ दिवसाच्या अंतराने तर उन्हाळ्यात ६ ते ७ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे.

### आंतरमशागत:

झाडाभोवतालचे तन काढून स्वच्छता ठेवावे. जमीन भुसभुशीत ठेवावी. या पिकास आधाराची गरज असल्यामुळे बांबू किंवा झाडाच्या वाढलेल्या फांद्यांचा वापर करावा, तसेच तारांवरसुद्धा वेली पसरवून त्यापासून चांगला नफा मिळविता येतो.

### काढणी:

लागवडीनंतर प्रथम तोडणी ७५ ते ८० दिवसात सुरु होते. फळांची त्या त्या जातीनुसार योग्य आकारात आल्यानंतर कच्च्या अवस्थेत केली जाते. पूर्ण वाढलेली पन कोवळी फळे काढावीत. नखाने हळूच दाबल्यास व्रण पडतो ती फळे कोवळी समजावीत. जास्त कोवळी व जास्त पक्व फळे काढू नये.




### उत्पादन:

जातीनुसार व हंगामनुसार हेक्टरी ७५ ते १०० क्विंटल उत्पन्न मिळते.

(संपर्क: +९१ ९४०४८८७०३६)

★ ★ ★